# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र.झोपुप्रा/सहनि/अ-१/SRA/CO/OW/ ४४५३७ /सन २०२१
सहकार कक्ष, झो.पु.प्रा., मुंबई
दिनांक : २२.११.२०२१

प्रति,
विकासक मे. नाईकनावरे डेव्हलपर्स ॲन्ड
सुन्हार इन्फ्राकॉन एलएलपी.,१, विद्या भवन, १२१,
केलुस्कर रोड, अपो. सेना भवन, शिवाजी पार्क, मुंबई-४०००२८.

**विषय : जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**
जागृती एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सीटीएस नं. ७६, व्हिलेज कोले कल्याण, वाकोला, सांताक्रुज (पुर्व),मुंबई-४०००५५ या संस्थेच्या पुनर्वसन योजनेच्या इमारतीमधील एकुण २३ निवासी सदनिका वाटपाबाबत.

उपरोक्तप्रमाणे प्राधिकरणाकडिल परिपत्रक क्र. १६२ नुसार **जागृती एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सीटीएस नं. ७६, व्हिलेज कोले कल्याण, वाकोला, सांताक्रुज (पुर्व), मुंबई-४०००५५** या पुनर्वसन योजनेच्या इमारतीमधील **सदनिकांचा वाटपाचा कार्यक्रम दिनांक ३०.११.२०२१ रोजी ठिक दुपारी १२.३०** वाजता प्राधिकरणाच्या **कार्यालयात ऑनलाईन पध्दतीने झूम ॲप** (Zoom App) **वर आयोजित करण्यात आलेला आहे.** सदर कार्यक्रमाची नोटिस प्रसिध्द करावयाची असुन नोटिसची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

सदर नोटिस शासकिय दराप्रमाणे एक मराठी वर्तमान पत्रामध्ये तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी. आपणांकडुन प्राप्त झालेली वाटप यादी व कार्यक्रमाची नोटिस पुनर्वसन योजनेच्या भुखंडावर प्रसिध्द करण्यात यावी. तसेच सदरची नोटिस संबंधित पात्र झोपडीधारकांना पोहच करावी.

( चंद्रकांत एन.पवार )
प्राधिकृत अधिकारी तथा
सहकारी अधिकारी (श्रेणी-१),झोपुप्रा,मुंबई

प्रत :१) माहिती तंत्रज्ञान विभाग,झोपुप्रा.,मुंबई.
२/- यांनी सोबतची नोटिस व वाटपासाठीची पात्र झोपडीधारकांची यादी प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.
२) वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी.

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र. झोपुप्रा/सहनि/अ-१/SRA/CO/OW/ ४४५२९ /सन २०२१

सहकार कक्ष, झो.पु.प्रा., मुंबई,

दिनांक : २२.११.२०२१

**-: ऑनलाईन सोडत पध्दतीने सदनिका वाटपाची सुचना :-**

जागृती एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सीटीएस नं. ७६, व्हिलेज कोले कल्याण, वाकोला, सांताक्रुज (पुर्व),मुंबई-४०००५५ या भुखंडावरील पुनर्वसन योजनेमधील पात्र झोपडीधारकांना कळविण्यात येते की, प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. १६२ / दिनांक २३.१०.२०१५ व अंशत: बदल आदेश दिनांक ३०.०६.२०२० नुसार संस्थेतील एकुण २३ पात्र झोपडीधारकांना निवासी सदनिकांचे सोडत पध्दतीने वाटप करण्यासाठी प्राधिकरणाकडिल सहकार कक्षाकडिल दिनांक १८.११.२०२१ रोजीच्या टिपणीनुसार मी निम्मस्वाक्षरीकार माझी प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार निवासी झोपडीधारकांची यादी पुनर्वसन योजनेच्या भुखंडावर नोटिशीसोबत प्रसिध्द करण्यात येत आहे. प्रसिध्द केलेल्या यादीतील पात्र झोपडीधारकांच्या नावासंबंधित सुचना व हरकती असल्यास दिनांक २९.११.२०२१ पर्यंत प्राधिकरणाच्या खालील नमुद ईमेल आयडीवर सादर कराव्यात. **सुचना व हरकती विचारात घेऊन कायम केलेली एकुण २३ पात्र झोपडीधारकांसाठी सदनिका वाटप सोडतीचा कार्यक्रम दिनांक ३०.११.२०२१ रोजी ठिक दुपारी १२.३० वाजता प्राधिकरणाच्या कार्यालयात ऑनलाईन पध्दतीने झूम ॲप (Zoom App) वर आयोजित केलेली आहे.** प्रसिध्द केलेल्या यादीनुसार पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडीधारकांना झूम ॲप (Zoom App) वर सोडतीद्वारे निवासी सदनिकांचे वाटप करण्यात येणार आहे. त्यानुसार सोडतीच्या दहा मिनिट अगोदर खाली दिलेल्या लिंकवर विहित तारखेस लॉटरी प्रक्रियेत सहभाग घेण्यात यावा.

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. १६२/दि. २३.१०.२०१५ व ऑनलाईन पध्दतीने लॉटरी घेणेकामी अंशत: बदल आदेश दिनांक ३०.०६.२०२० नुसार ऑनलाईन झूम ॲप (Zoom App) वर सोडत पध्दतीने पुनर्वसन योजनेच्या इमारतीमधील एकुण २३ निवासी सदनिकांचे वाटप करणे.p

झूम ॲप (Zoom App) वरील लिंक : https://us02web.zoom.us/j/4759864543?

Pwd = eFFsQ25paHQ5czhDWVN0WSs3N25odz09

Meeting ID : 475 986 4543

Passcode : 123456

(चंद्रकांत एन.पवार)

प्राधिकृत अधिकारी तथा

सहकारी अधिकारी,(श्रेणी-१),झोपुप्रा,मुंबई.

टिप :

१) सोडतीसाठी पात्र (पती/पत्नी) झोपडीधारकांनीच ऑनलाईन लॉटरीमध्ये विहीत वेळेत व तारखेस सहभागी व्हावेत.

२) सोडतीच्या वेळी ज्या झोपडीधारकांचे नाव परिशिष्ट-२ मध्ये पात्र आहेत अशा व्यक्ती अंध,अपंग, विधवा महिला कुटुंब प्रमुख यांनी पुनर्वसन इमारतीमधील खालच्या मजल्यावरील सदनिकांची प्राधिकरणाच्या sravcmumbai@gmail.com या ईमेल आयडीवर दिनांक २९.११.२०२१ पर्यंत लेखी पत्राने मागणी केल्यास परिपत्रकातील तरतुदीनुसार सदनिका वाटप करण्यात येईल. सदर गटातील व्यक्तींनी ईमेल आयडीवर शासनमान्य अंध-अपंग,विधवा याबाबतचा पुरावा दाखला सादर करावा.

प्रति : संस्थेच्या नोटिस बोर्डावर माहिती व प्रसिध्दीसाठी.

प्रत : माहितीसाठी सविनय सादर : मा. सहनिबंधक,सहकारी संस्था (पुर्व व पश्चिम उपनगरे),झोपुप्रा.,मुंबई